ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 8 | APRIL - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवणारे महानायक श्री वसंतरावजी नाईक साहेब



**रोहित बाबूसिंग चव्हाण**
**संशोधक विद्यार्थी,**
**मु.पो.कळंबा बोडखे , ता. मंगरुळपिर जि. वाशीम.**

## प्रस्तावना :-

महाराष्ट्रही नवरत्नाची खान आहे. समाज सुधारकांची जननी आहे. या पावन भूमीवर विविध समाजाच्या विविध स्तरातून थोर पुरुष जन्माला आले या थोर पुरुषांपैकी हरितक्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक हे एक आहेत.सौजन्य, अभिजात, सुसंस्कृतपणा, मानवता, लोकशाही पद्धतीचा कैवारी,अभ्यासू वृत्ती या सर्वांचे एकत्रीकरण म्हणजेच वसंतराव नाईक यांचे व्यक्तिमत्व व कर्तव्य होय. हे एक कर्तुत्ववान व्यक्तिमत्व १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील पूसनदीच्या खोऱ्यात बसलेल्या गहुली या गावाच्या माळ पठारावर जन्माला आलेला. वसंत नावाचा हरित क्रांतीचे प्रणेते पताका आपल्या खांद्यावर घेऊन सहृदय सहकाऱ्यांच्या दिंडीसह थेट अरबी समुद्राच्या काठावर मुंबई महानगरीत जाऊन धडकला आणि कृषीक्रांती चा महामंत्र महाराष्ट्राला देऊन गेला. होय तो जणू अप्रेषित होता. बंजारा समाजातील सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन असामान्य कर्तृत्व गाजविणारा आणि कृषीक्रांतीची पडघम केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतायांच्या मनात ठेवणारा अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा प्रेषित.

## हरितक्रांतीचा महामंत्र देऊन कृषी उत्पादनात बदल घडवून आणला :-

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व स्वीकारले तो काळ फार अवघड होता. देश आणि विशेषता महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत संकटात होता. महाराष्ट्र राज्याची नुकतीच निर्मिती झाली होती. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत भीषण दुष्काळ, परकीय आक्रमणे,महापूर कोयना भूकंप इत्यादी नैसर्गिक आपत्ती सोबतच संप,मोर्चे,आंदोलने,जातीय दंगली अशा मानवनिर्मित आपत्ती देखील आल्यात परंतु आपल्या झुंजार नेतृत्वाने आणि प्रखर आत्मविश्वासाने वसंतरावांनी या आपत्तीवर यशस्वीपणे मात करून एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे अविचल न होता अटल राहिले.

महाराष्ट्र शेती व उद्योग क्षेत्रात मागासलेला होता त्यामुळे वसंतराव नाईक आणि महाराष्ट्राला विकासाच्या प्रगतीपथावर आणण्यासाठी विविध योजना आखून त्याची अंमलबजावणी केली व महाराष्ट्राला निंदनीय अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी आधुनिक शेती करण्यासाठी प्रोत्साहन देऊन पूरक व्यवसाय करण्यास प्रेरित केले. वसंतरावांनी हरितक्रांती घडून आणण्यासाठी महाराष्ट्रात विविध दौरे करून शेतकऱ्यांना संकरित बियाणे आधुनिक यंत्रे, सिंचन व्यवस्था या बाबीचे महत्त्व पटवून दिले व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हरितक्रांतीचा महामंत्र देऊन कृषी उत्पादनात बदल घडून आणला.

भारतात १९६४ व १९६७ या काळात पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश,गुजरात या राज्यात कृषी उत्पादन लक्षणीय वाढ घडून आली. या राज्यातील कृषी,गहू व तांदूळ उत्पादनात अधिक वाढ झाल्याने वसंतरावांनी या राज्यांनी अवलंबलेल्या पद्धतीने महाराष्ट्र कृषी करण्याचे ठरवले व ते निर्णय यशस्वीपणे सफल झाले. त्यामुळे महाराष्ट्रात हरितक्रांती घडून आणण्यासाठी वसंतराव नाईक यांच्यावर देशात घडून आलेल्या हरितक्रांतीचा विशेष प्रभाव होता. वसंतराव नाईक आधुनिक विचारांचे समर्थक तसेच महाराष्ट्र राज्याच्या विकासाचा विचार करताना वसंतरावानी शेतीविषयक ज्ञान,महाराष्ट्राची भौगोलिक आणि मराठी शेतकऱ्यांचा बाणा ओळखून पाऊले उचलली.

विदर्भ,मराठवाडा,कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या भागातील शेतकऱ्यांची जमिनी,पावसाचे प्रमाण भिन्न असूनही त्यांच्यातील लघुत्तम सुधारक विभाजक ओळखून विविध धोरणे आखली. त्या अर्थाने असे म्हणता येईल की महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर च्या कृषी धोरणाचा आणि विकासाचा पाया त्यांनी रोवला.

### शेती संपन्न झाली तरच लोकशाही संपन्न होईल, शेती मोडली तर लोकशाही मोडेल:-

" शेती संपन्न झाली तरच लोकशाही संपन्न होईल शेती मोडली तर लोकशाही मोडेल " हे प्रकट शब्द महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांनी ७ जून १९७१ रोजी नाशिक येथे झालेल्या काँग्रेस शिबिरात शेतीचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेऊन काढले असावे कारण शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे चांगल्या बियाणांची निवड करणे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक पद्धतीने शेती करण्यावर वसंतरावांनी अधिक भर दिले. शेती विकासाबरोबरच जंगलविकास, कुकुटपालन, पशुपालन, मधुमक्षिकापालन आधी व्यवसाय यांची सांगड शेती व्यवसायासाठी वसंतरावांनी उत्पादनात वाढ होऊन ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था सुधारण्यास फार मोठी मदत होईल म्हणून त्यांना कृषी विकासाला अधिक महत्त्व दिले. वसंतराव नाईक यांची खरी ओळख ही महाराष्ट्राचे हरितक्रांतीचे प्रणेते अशी आहे. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी शेती, महसूल,राज्यभाषा, दारूविक्री,सरकारी कार्य,दुष्काळ, अन्नधान्यात स्वयंपूर्णता, चार कृषी विद्यापीठाची स्थापना,शेतीपूरक नव्या बियाण्यांच्या संशोधनाला चालना,तंत्रज्ञानाचा विकास या बाबीवर व्यक्तिगत लक्ष देऊन कृषी संशोधन शेतकऱ्यांच्या शिवरापर्यंत पोहोचण्याची,महाराष्ट्र सामाजिक दृष्ट्या पुरोगामी, आधुनिक दृष्ट्या प्रगत आणि आर्थिक दृष्ट्या संपन्न पायाची उभारणी केली आहे.

### निश्चयाचा महामेरू:-

भारत देशाच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता अन्न ही गरज भागवण्यासाठी इतर प्रदेशावर अवलंबून रहावे लागेल असा लोकांचा समज होता. महाराष्ट्रात अन्नधान्याची समस्या लक्षात घेऊन अन्नधान्याच्या बाबतीत राज्याला स्वयंपूर्ण करण्याचा निश्चय त्यांनी घेतला. १९६५ मध्ये पुण्याच्या सभेत लालबहादूर शास्त्री यांनी सांगितले की चार महिन्यापासून अमेरिकेच्या अध्यक्ष समोर ४८० कराराचे पेपर पडलेले आहेत ते सही करीत नाहीत आम्हाला अत्यंत वैताग आला तेव्हा वसंतराव नाईक म्हणाले अमेरिकेचे धान्य आल्याशिवाय आम्ही जगू शकत नाही का? अशी परिस्थिती असेल आणि मुलांना आम्ही जीवापलीकडे जपतो ही मुले आम्ही सोडावी असे दडपण अमेरिका आणत असेल तर त्या जीवनाचा आम्हाला धिकार आहे. यावेळी नाईक साहेबांनी पुण्यातील शनिवार वाड्यावर जाहीर सभा घेतली या सभेत मुख्यमंत्री काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष होते त्यावेळी नाईक साहेब म्हणाले मी वसंतराव नाईक प्रतिज्ञा करतो की येत्या दोन वर्षात महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो अन्यथा मला जाहीरपणे फाशी द्या. अशाप्रकारे जाहीरपणे आपले मत प्रकट करणारे नाईक साहेब यांनी दोन वर्षात महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत सुजलाम सुफलाम बनवले म्हणून नाईक साहेबांना हरितक्रांतीचे प्रणेते असे म्हणतात. महामेरू म्हणजे हिमवनातील एक सोनेरी शिखर ज्याचे तेज सूर्याहूनही अधिक आहे याचा उल्लेख पुराणात महाभारतात आढळतो. निश्चयाचा महामेरू म्हणजेच केलेल्या निर्धारावर एखाद्या उत्तुंग शिखराप्रमाणे ठाम राहणारा समर्थ रामदास स्वामींनी छत्रपती शिवाजी महाराजांना निश्चयाचा महामेरू उक्ती दिली आहे. ज्यांनी स्वराज्याचा निर्धार केला आणि त्यावर महामेरू सारखे ठाम राहून आपल्याला आजचा सोन्याचा दिवस दाखवला. त्याच प्रमाणे वसंतरावजी नाईक यांनी सुद्धा आपल्या मनामध्ये निश्चय करून महाराष्ट्रामधील शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रयत्न केले म्हणून नाईक साहेब यांनासुद्धा निश्चयाचा महामेरू म्हणने वावगे ठरणार नाही.

### चार कृषी विद्यापीठाची स्थापना:-

महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठाची स्थापना हा निर्णय म्हणजे वसंतरावजी नाईक यांच्या शेतीविषयक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सर्वोच्च कळस होता. भारत सरकारच्या शिक्षण विभागाने १९६४-६५ च्या दरम्यान कोठारी आयोगाची नेमणूक केली होती.या कोठारी आयोगाने शेती सुधारणेच्या कार्यक्रमाला अग्रक्रम द्यावा अशी शिफारस करताना असेही सुचवले होते की प्रत्येक राज्यात किमान एक कृषी विद्यापीठ असावे. त्या कृषी विद्यापीठाचे स्वरूप,त्याची कार्यक्षमता याबाबतचे स्पष्ट सूचना कोठारी आयोगाने दिलेल्या होत्या.कृषी क्षेत्रात संशोधन,अध्यापन व कृषी सेवा अशा त्रिसूत्री द्वारे शेती सुधारण्याचा संकल्प केला गेला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना परंपरागत शेतीच्या मायाजाळातून बाहेर काढण्यासाठी व त्यांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी कृषी विद्यापीठ स्थापन करावे असा अहवाल १९ नोव्हेंबर १९६५

मध्ये कृषी विद्यापीठ सल्लागार समितीने शासनाला सादर केला. या शिफारसी मध्ये तज्ञ समितीने या विधेयकाची पार्श्वभूमी सांगताना शेतकऱ्यांना योग्य माहिती पुरवणे, बाजारपेठेचे ज्ञान देणे,नवीन तंत्रज्ञानाची माहिती देणे,संकरित बियाणांना अधिक समृद्ध करणे इत्यादी असल्याचे स्पष्ट केले.वसंतरावजी नाईक यांनी या विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की केवळ संकरित बियाणे उत्पादनात वाढ होणे अवघड आहे त्यासोबत कमी पावसात अधिक उत्पन्न देणारे बियाणे शोधणे संशोधन करणे. मातीचा पोत कसा आहे,कापसाच्या जातीचे तसेच फळा वरील संशोधन महत्त्वाचे आहे ही बाब लक्षात आल्यानंतर महाराष्ट्रातील शेती अधिक समृद्ध करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठाची स्थापना केली. महाराष्ट्रात कृषी विद्यापीठ स्थापन करण्याकरिता वसंतरावांनी शेतीविषयक संशोधन शिक्षण आणि प्रशिक्षण याची गरज ओळखून पहिल्या प्रथम कृषी संचालकाच्या अध्यक्षतेखाली १० तज्ञ सदस्यांनी १सप्टेंबर १९६४ रोजी एक समिती नेमण्यात आली या समितीने कृषी विद्यापीठाच्या स्थापनेचा आराखडा आणि अहवाल तयार करून त्यात सात जणांचा समावेश करण्यात आला. १२ ऑक्टोंबर १९६६ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत या अहवालावर चर्चा झाली आणि मंत्रिमंडळाने हा अहवाल जशाचा तसा मान्य केला. या अहवालानुसार पहिले कृषी विद्यापीठ अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथे उभारले. या समितीची शिफारस मंत्रिमंडळाने मान्य केली प्राध्यापकांना प्रशिक्षण देणे अशा सर्व बाजूंचा विचार करून १९६८ मधील राहुरी येथे पहिल्या कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

राहुरी येथे स्थापन झालेल्या कृषी विद्यापीठाला महात्मा फुले कृषी विद्यापीठ असे नाव देण्यात आले. या विद्यापीठात भरघोस फळ विकासासाठी उपयुक्त संशोधन करण्यात आले. राहुरी  नंतर दुसरे कृषी विद्यापीठ १९६९ साली अकोला येथे स्थापन करण्यात आली या विद्यापीठाला विदर्भातील केंद्रीय कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ असे नाव देण्यात आले. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आज विदर्भात कृषी संशोधनात अग्रेसर बनले आहेत या विद्यापीठातून कृषी फलोत्पादन,कृषी अभियांत्रिकी व वनशास्त्र विद्याशाखेतील विज्ञान स्नातक ही पदवी बहाल करण्यात येते तसेच या विषयातील पदव्युत्तर शिक्षणही दिले जाते. राहुरी आणि अकोला पाठोपाठ आज परभणी येथे मराठवाड्यातील पहिले कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय वसंतरावजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. परभणी येथे स्थापन केलेल्या कृषी विद्यापीठाला मराठवाडा कृषी विद्यापीठ नावाने स्थापन करण्यात आले. या विद्यापीठातून कडधान्य व खरीप पिकांची संशोधन मोठ्या प्रमाणात केले जाते. वसंतरावजी नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आता या विद्यापीठाचे नामकरण वसंतरावजी नाईक कृषी विद्यापीठ असे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील चौथे विद्यापीठ कोकणातील दापोली येथे स्थापन करण्यात आले या विद्यापीठाला राज्याचे पहिले कृषिमंत्री पि. के. उर्फ बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ नाव देण्यात आले.वसंतरावांनी महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठे स्थापन करून महाराष्ट्रातील विभागीय  समतोल अतिशय कुशलतेने सांभाळला.

## निष्कर्ष:-

अशा प्रकारे केवळ शेतीच्या उत्पादन वाढीसाठी शास्त्रीय भूमिका घेऊन  नाईकसाहेबांनी चार कृषी विद्यापीठामार्फत ज्वारी,कापूस, गहू भात,हरभरा,भुईमूग,संत्रा,चिक्कू या पिकासाठी संशोधनाची व्यवस्था केली. त्याचबरोबर जलसंधारण, जलसिंचन याच्या प्रशिक्षणाची व्यवस्था या विद्यापीठामार्फत करण्यात आली. देशाच्या कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कार्यकाळात त्या राज्यातल्या भागात एकाच वेळी चार कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात यशस्वी झाले नाही. हा विक्रम फक्त वसंतरावजी नाईक यांनीच केला वसंतरावांनी स्थापन केलेल्या चार कृषी विद्यापीठे मुळेच भरघोस पीक देणाऱ्या पिकांची नवीन जाती,नवीन बियाणे,खत व्यवस्थापन,जल व्यवस्थापन, कीड नियंत्रण याचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना विद्यापीठामार्फत होत असल्याने महाराष्ट्रातील शेती समृद्ध झाली आहे. याचे संपूर्ण श्रेय वसंतरावजी नाईक यांनाच आहे. त्यामुळे महाराष्ट्राला कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवणारे हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतरावजी नाईक हे कृषी क्षेत्रातील निश्चयाचा महामेरू असल्याचे दिसून येते.

## संदर्भसूची:-

१) राठोड राजाराम, (सं.पा.) हिरवी क्षितीजे १९८७ पृ. क्र. ७.
२) लोकमत विशेषांक १९७३.
३) मधुकर भावे, यशवंतराव ते विलासराव २००८ पृ. क्र. ७८. - ४) लोकराज्य, डिसेंबर २०१२ पृ.क्र. ४६. - - पृ.क्र.४६.
५) दर्डा विजय, लोकमत (सं.पा.) व.ना.प.पू.वि. १९७३ पृ.क्र.३.
६) लोकराज्य - डिसेंबर २०१२ - पृ.क्र. ३८. -

७) राठोड राजाराम, (सं.पा.) वर्षा निबंध संग्रह १९८० - पृ.क्र.७३.
८) राठोड राजाराम, (सं.पा.) हिरवी क्षितीजे १९८७ पृ.क्र. १६.
९) मधुकर भावे, महानायक २०११ पृ.क्र. ३१४.
१०) कित्ता - पृ.क्र.३१५.